भक्तीचा प्रकाश जीवनात आनंद आणि समृद्धी देतो

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार २७ जुले २०२५ | अंक २१८० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Touriism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक 1st TIME in TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# सर्वांना विष पाजा, मगच धनंजय मुंडेंच्या मंत्रिपदावरुन करुणा मुंडे आक्रमक; अजितदादांना इशारा!

धनंजय मुंडे यांना मंत्रिपद देताना अजित पवार यांनी एक बाब लक्षात ठेवली पाहिजे. अजित पवार हे लोकप्रतिनिधी आहेत. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांचे तुम्हाला दु:ख दिसत नाही. महादेव मुंडे, झरीन शेख, काका गर्जे अशी अनेक प्रकरणं आहेत. शासन, प्रशासनाला हाताशी धरून या लोकांनी बीडमध्ये काळा बाजार करून ठेवला आहे, अशी घणाघाती टीका करुणा मुंडे यांनी केलीय. तसेच तुमच्याकडे चांगले लोक नसतील तर तुमचा पक्ष बंद करून टाका, असा सल्लाही करुणा मुंडे यांनी अजित पवार यांना दिला.तुम्ही सगळ्यांना विष पाजा आणि... . यावेळी बोलताना पालकमंत्री असतानाही तुम्हाला बीडच्या जनतेचे, करुणा मुंडे यांचे, ज्ञानेश्वरी मुंडे, संतोष देशमुख यांच्या कुटुंबाचे दु:ख दिसत नसेल तर तुम्ही सगळ्यांना विष पाजा आणि त्यानंतरच धनंजय मुंडे यांना मंत्रिपद द्या, असा हल्लाबोल करुणा मुंडे यांनी केला. संपूर्ण जनतेला घेऊन रस्त्यावर उतरणार अजित पवार यांच्याकडे सत्य ऐकण्याची शक्ती नाही. तुम्ही धनंजय मुंडे यांनी यांना मंत्रिपद दिलं तर मी महाराष्ट्राच्या संपूर्ण जनतेला घेऊन रस्त्यावर उतरणार आहे, असा इशाराच करुणा मुंडे यांनी अजित पवार यांना दिला. अजित पवार नेमकं काय म्हणाले होते?दरम्यान, धनंजय



मुंडे कृषिमंत्री असताना त्यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप करण्यात आले होते. याच प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना क्लीनचीट दिली आहे. त्यानंतर अजित पवार यांनी त्यांची आणखी एका प्रकरणात चौकशी सुरू आहे. त्यातही क्लीनचीट मिळाली तर आम्ही मुंडे यांना पुन्हा मंत्रिपद देण्याबाबत विचार करू, असं विधान अजित पवार यांनी केलं होतं. त्यानंतर मुंडे यांचा पुन्हा मंत्रिमंडळात समावेश होणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात होता. अजित पवार यांच्या विधानानंतर विरोधकांनी त्यांच्यावर सडकून टीका केली होती. मुंडे यांना मंत्रिमंडळात घेण्याची घाई केली जात आहे, असाही हल्लाबोल विरोधकांनी केला होता

## धनंजय मुंडे यांना सहआरोपी करू

अजित पवार यांनी धनंजय मुंडे यांना मंत्रिपद दिलं तरी संतोष देशमुख हत्या प्रकरणात आम्ही धनंजय मुंडे यांना सहआरोपी करू. त्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. महाराष्ट्रातल्या जनतेला घेऊन आम्ही अजित पवार यांच्या घरासमोर बसणार आहोत. आम्ही मनमानी चालू देणार नाही, असा पवित्रा करुणा मुंडे यांनी घेतला आहे.

# सरकार निकम्मी:भर सभेत नितीन गडकरींचं विधान; असं नेमकं का म्हणाले?

वडवणी बीड प्रतिनिधी अंकुश गवळी

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे ओळखले जातात. एखादी गोष्ट पटली नाही की ते थेट सांगतात. त्यांच्या कामाचा वेग, त्यांच्याकडे असलेल्या खात्याविषयी असलेली असलेली इत्यंभूत माहिती, तोंडपाठ असलेली आकडेवारी यामुळे गडकरी कायम चर्चेत राहणारे केंद्रीय मंत्री आहेत. गडकरी हे असे नेते आहेत, ज्यांच्या प्रत्येक शब्दाला किंमत आहे. दरम्यान,



त्यांनी आता नागपुरात बोलताना मोठे विधान केले आहे. त्यांच्या या विधानाचे अनेक अर्थ काढले जातात. माझ्या अनुभवातून लक्षात आलंय की सरकार निकम्मी असते, असं ते भाषणात म्हणाले आहेत. चालत्या गाडीला पंक्चर करण्याचं मला नागपुरात खेळाचे ३०० स्टेडियम बनवायचे आहेत. पण माझ्या चार वर्षांच्या अनुभवातून हे लक्षात आलं की सरकार निकम्मी असते. महानगरपालिका, एनआयटी यांच्या भरवशावर काही काम होत नाही. चालत्या गाडीला पंक्चर करण्याचं महारथ यांच्याकडे आहे, असं नितीन गडकरी म्हणाले. तसेच, मी राजकारणात आहे. हा फुकट्यांचा बाजार आहे. प्रत्येक गोष्ट फुकटची पाहिजे असते. पण मी फुकटंच देत नाही, असं म्हणत त्यांनी देश तसेच राज्यातल्या राजकारणावर भाष्य केले.माणूस या नशेत जेव्हा काम करतो तेव्हा तो:माणूस नशेत असतो तेव्हा विचार करणे बंद करतो. नशा म्हणजे दारू नव्हे तर खेळाची नशा असते, राजकारणाची नशा असते, तर कोणाला ज्ञानाचीही नशा असते. माणूस या नशेत जेव्हा काम करतो तेव्हा तो विचार करायचं बंद करतो. जेव्हा त्याला यश मिळते तेव्हा त्याला त्या यशाची सवय होते, असं मत नितीन गडकरी यांनी व्यक्त केलं.

## अवघ्या दोन वर्षाच्या आतच ध्रुव युवराज चरखा याने कोरले वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव





बीड । प्रतिनिधी ध्रुव युवराज चरखा या मुलाने वयाची दोन वर्ष पूर्ण करण्या अगोदरच जागतिक विक्रम स्वत:च्या नावे केला. ज्या वयात लहान मुले गेम्स, व्हिडिओ, रिल्स, टीव्ही बघणे यामध्ये व्यस्त असतात, त्या वयात ध्रुव, मराठी मध्ये महिने, इंग्लिश महिने, मराठी तसेच इंग्लिश मध्ये अंक, विविध श्लोक, विविध देशाचे ध्वज ओळखणे, आठवड्याचे दिवस सांगणे, प्राणी, पक्षी, भाज्या, फळे, दिशा अचूक ओळखतो. पाढे बोलून समोरच्या व्यक्तीला अवाक करतो. दीड वर्षाचा असल्यापासून त्याने हे बोलून दाखवायला सुरुवात केली. हळूहळू करत त्याने विविध गोष्टी आत्मसात केल्या. मुळात कमी स्क्रीन टाईम कमी, हेल्दी डायट करणे, परिवारासोबत संवाद, प्रश्न या सर्व गोष्टींनी त्याला पुढे जायला मदत के ली. त्याच्या या सर्व कार्याची नोंद थजठडऊथखऊए इजजघ जऋठएउजठऊ मध्ये झाली. त्याच्या या बालकामगिरीने बीड जिल्ह्याच्या धर्तीवर मानाचा तूरा रोवला. परिश्रम, सातत्य, जिद्दीमुळे हे सर्व ध्रुव ला शक्य झाले

## धनगरवाडी कडून माने वस्तीकडे जायला व्यवस्थित रस्ता नाही, स्थानिक सरपंच ग्रामसेवक यांचे दुर्लक्ष, सर्वसामान्य जनतेचे हाल हनुमंत लकडे



बीड प्रतिनिधी, बीड तालुक्यातील धनगरवाडी या गावातून जवळच असलेल्या माने वस्ती कडे जायला रस्ता नाही, गेल्या अनेक वर्षापासून हा रस्ता होत नसल्याचा संतप्त ग्रामस्थांचा आरोप आहे, या वस्तीकडे जायला ॲम्बुलन्स ला सुद्धा जायला रस्ता नाही, कधीकाळी या रस्त्यावरून पेशंट डोक्यावर आणण्याची वेळ ग्रामस्थांवर येत आहे, शाळेची बस जात नाही, यावेळी या गावचे विद्यमान सरपंच करतात तरी काय असा सवाल यावेळी ग्रामस्थ करीत आहेत, त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये ग्रामस्थ आंदोलन करण्याची तयारीत असल्याचा इशारा या गावचे सामाजिक कार्यकर्ते हनुमंत लकडे यांनी दिला आहे

# माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पासष्ठव्या वाढदिवसानिमित्त दहाफूट उंचीची पासष्ठ वृक्षची लागवड, - शिवसेना - शिक्षकसेनेचा उपक्रम

बीड : (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पासष्ठव्या वाढदिवसानिमित्त शिवसेना व शिक्षकसेनेच्या वतीने दहाफुट उंचीचे पासष्ठ वृक्षाचे रोपण जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या नेतृत्वात करण्यात आले.

शिक्षकसेनेच्या वतीने उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा वाढदिवस प्रेरणा वर्ष म्हणून साजरा होत आहे. शिवसेना व शिक्षकसेनेच्या वतीने आज बीड शहरातील पांगरी रोड परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये जांभूळ, पळस, नांदूरकी, इंडियन



क्रिस्मस ट्री या सारखी उंच वाढणारी व परिपूर्ण वाढ झालेली दहा फुट उंचीची पासष्ट झाडे लावण्यात आली.

या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या सह राज्य शिक्षक सेनेचेविधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, महिला आघाडी च्या मीराताई नवले, उपजिल्हा प्रमुख राजाभाऊ माहुवाले, माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे महाराष्ट्रराज्य शिक्षकसेनेचे उपाध्यक्ष मा. दत्ताभाऊ पवार, मराठवाडा अध्यक्ष नामदेवरावजी सोनवणे , महाराष्ट्रराज्य तंत्रनिकेतन कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष रवींद्र दहाटे सर, शिवसेनेचे जेष्ठ सल्लागार व शिवसैनिक संभाजी गजले सर, शिक्षकसेना जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ, संजय ढाकण, जिल्हा सरचिटणीस नरेश गंधगे, कार्याध्यक्ष आप्पा डोके, जिल्हा उपाध्यक्ष महादेव वाघमारे वाघमारे, बीड तालुका अध्यक्ष उद्धवजी घोडके, प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण वाघमारे, राजाभाऊ हुरकुडे गणेश लोणकर, रंगनाथ पैठणकर, सचिन साळुंखे सह आदी शिवसैनिक उपस्थित होते.

## नाळवंडी सर्कल मध्ये संदीप डावकर यांची जोरदार चर्चा

### सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवणारे नेतृत्व म्हणजे संदीप डावकर



बीड प्रतिनिधी अंकुश गवळी

बीड तालुक्यातील ब्रह्मगाव मौज आणि मौजवाडी येथील विद्यमान सरपंच संदीप डावकर यांनी गावतील सरपंच पदाच्या माध्यमातून अनेक प्रश्न सोडवले. गावात पाण्याचा प्रश्न भयंकर होता यावेळी त्यांनी जलजीवन च्या माध्यमातून घरोघरी नळ बसवले, चालु वर्षे जनतेने त्यांना बिनविरोध निवडून दिले, आणि आता हे पाच वर्षे ते सध्या या गावचे विद्यमान सरपंच म्हणून पदवर कार्यरत आहेत, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे २५ वर्षापासून ते एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे, योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या नेतृत्वखाली पण ते सध्या या सर्कलमध्ये काम करत आहेत ,गावात सर्वसामान्य लोकांच्या मदतीला सर्वसामान्य जनतेच्या अडचणी त्यांच्या विविध प्रश्नावर ते सातत्याने आक्रमक असतात, ते प्रश्न ते त्यांच्या माध्यमातून सोडवतात, येणाऱ्या काळामध्ये लवकरच जिल्हा परिषद निवडणूक ही लागणार आहे, नाळवंडी सर्कल मध्ये पण त्यांचा मोठा तगडा जनसंपर्क आहे, येणाऱ्या काळातील जिल्हा परिषद निवडणूक मध्ये उतरणार असल्याची चर्चा नाळवंडी सर्कल मध्ये सध्या जोरदार रंगू लागले आहे, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या माध्यमातून त्यांनी अनेक कामे केली आहेत, त्यामुळे एकंदरीत त्यांना नाळवंडी जिल्हा परिषद निवडणूक सोपी जाऊ शकते असा जाणकारांचा दावा आहे,

# कर्म चांगली करा; जोडलेली माणसे संकटातही सोबत राहतात: बळीराम गवते: पारगाव शिरस येथे सत्कार; ग्रामस्थांची प्रचंड गर्दी

बीड/प्रतिनिधी: कर्म चांगली करायचे. संकटे येतात आणि जातात. मला एवढ्या मोठ्या सत्काराची मला सवय नाही. आपण केलेला सत्कार मी कधीही विसरणार नाही. तुमचे प्रश्न सोडवायचा प्रामाणिक प्रयत्न करेल. आयुष्यात माणसेच जोडत आलो असून हीच आपली खरी कमाई आहे. हीच माणसे संकटातही सोबत राहतात, असे प्रतिपादन राष्ट्रवादीचे युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी केले. पारगाव शिरस येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सत्कार सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी गोवर्धन काशीद, सरपंच दिनकर जमदाडे, मुस्ताक शेख, आकाश झुनगुरे, रामकिसन वाटमोडे, शिवाजी सरडे, मौला भाई, मुकुंद धुताडमल, अनिल चव्हाण, संदीप काटकर, भागवत मस्के,



आप्पा इंदूरे, पवन बन आदी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना बळीराम गवते पाटील म्हणाले, संकटे येत असतात, त्या संकटावर मात करून पुढे जायचे असते. मला एवढ्या मोठ्या सत्काराची मला सवय नाही. आपण केलेला सत्कार मी कधीही विसरणार नाही. तुमचे प्रश्न सोडवायचा प्रामाणिक प्रयत्न करून तुमच्या सर्वांसाठी मी चोवीस तास उपलब्ध राहीन. सर्वसामान्य माणसाची सेवा करणे हे माझे कर्तव्य आहे. यावेळी गोवर्धन काशिद म्हणाले, माणसं कशी जपायची हे आम्ही बळीराम गवते यांच्याकडून शिकलोत. यावेळी श्रीकांत नवले म्हणाले, बळीराम गवते पाटील यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्षपदी निवड झाल्याचा आम्हाला प्रचंड आनंद झाला. निवडीनंतर त्यांचा सत्कार आमच्या गावात व्हावा, ही आमची सर्वांची इच्छा होती. तुम्ही आमचे अनेक प्रश्न सोडवले. आमच्या संकट काळात तुम्ही आमच्या पाठीशी खंबीर उभे राहिलात. त्यामुळेच आज आमची समाजात ताठ मान आहे, असे गौरव उद्गार श्रीकांत नवले यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला गावकरी आणि पंच क्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बीड/महाराष्ट्र

मराठी साहित्य

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

रविवार २७ जुले २०२५

https://lokaarambh.com



## संपादकीय

### महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक लाख कोटी डॉलरचा टप्पा गाठेल

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था येत्या पाच वर्षांत एक लाख कोटी डॉलरचा टप्पा गाठेल, या ङ्गमॉर्गन स्टॅनलीफ च्या ताज्या अहवालात व्यक्त झालेल्या आशावादातून महाराष्ट्राचे देशातील आघाडीचे स्थान पुन्हा अधोरेखित झाले आहे. सत्ताधारी-विरोधकांच्या याबाबतच्या दाव्या-प्रतिदाव्यांपेक्षा अशा आंतरराष्ट्रीय संस्थेचा निष्कर्ष अधिक विश्वासार्ह व महत्त्वाचा ठरतो. सध्याचे राज्यांतर्गत उत्पादन (जीडीपी) ५३६ अब्ज डॉलर, म्हणजे सिंगापूरच्या बरोबरीने असल्याची बाबही राज्यातील नागरिकांना सुखावणारीच आहे. ङ्गमॉर्गन स्टॅनलीफ ने विविध क्षेत्रांमधील राज्याच्या प्रगतीचे तपशीलवार चित्र या अहवालात मांडले आहे. त्यामध्ये या प्रगतीमागील कारणे, प्रगती होत असलेल्या क्षेत्रांसह काही आव्हानांचीही चर्चा केल्याचे दिसते. त्यानुसार पावले टाकून सन २०३० पर्यंत सध्याच्या दुपटीने प्रगती करण्याचे आव्हानही या निमित्ताने अधोरेखित झाले आहे. वाहनांची निर्मिती आणि सुट्या भागांचे सर्वाधिक उत्पादन महाराष्ट्रात होत असून, देशातील या उत्पादनातील राज्याचा वाटा वीस टक्के आहे. त्याबरोबरच औषधे आणि वैद्यकीय उपकरण निर्मिती १६-१७ टक्के, कापडाचे उत्पादन ८-१२ टक्के इतके आहे. गुजरातपाठोपाठ महाराष्ट्र हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे निर्यातदार राज्य ठरले आहे. देशातील १५.४ टक्के निर्यात महाराष्ट्रातून होत असून, त्याचा देशाच्या ङ्गजीडीपीफ्त १३.७ टक्के इतका वाटा आहे. त्यामध्ये दागिने, इलेक्ट्रॉनिक वस्तू, रसायने, औषधे आणि यंत्रसामग्रीचा समावेश होतो. परकीय गु ंतवणुकीतही राज्य आघाडीवर असून, गेल्या वर्षी राज्यात १९.६ अब्ज डॉलरची गु ंतवणूक झाली आहे. विशेषत: आर्थिक व तंत्रज्ञानातील प्रगतीला गती देणाऱ्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील देशातील अठराशे ङ्गग्लोबल केपॅबिलिटी सेंटरफ्पैकी सर्वाधिक (७३०) सेंटर, ही स्पर्धात्मक युगात महाराष्ट्रासाठी विशेष अभिमानाची बाब ठरावी. या अहवालाने गु ंतवणुकीसह महाराष्ट्रातील औद्योगिकीकरण, निर्यात, आर्थिक शिस्त, साक्षरतेचे प्रमाण आणि स्थिर नेतृत्वाला या प्रगतीचे श्रेय दिले आहे. ङ्गजीडीपीफ्च्या तुलनेत कर्जांचे प्रमाण इतरांच्या तुलनेत कमी, सेवा क्षेत्राचे मोठ े योगदान; तसेच धातू, वाहन, अन्नप्रक्रिया, पेट्र ोलियम आणि यंत्रसामग्री या क्षेत्रांतील वाटचाल या विकासात महत्त्वपूर्ण ठरली आहे. गेल्या काही वर्षांत राज्यातील औद्योगिक क्षेत्राचे योगदान घटले असून सेवा क्षेत्राचे योगदान वाढत असल्याची नोंद पुढील दिशा दाखवते. आर्थिक प्रगतीमध्ये प्रामुख्याने गुजरात, तमिळनाडू आणि तेलंगण आदी राज्यांशी महाराष्ट्राची स्पर्धा आहे. त्यामुळेच एक लाख कोटी डॉलर अर्थव्यवस्थेच्या मार्गातील आव्हाने ओळखून उपायांची पावले टाकण्याची हीच वेळ आहे. सरकार पायाभूत सुविधांमध्ये मोठी गु ंतवणूक करीत असून त्यातून वाढवण बंदर, नवी मु ंबई विमानतळ, नुकताच पूर्ण झालेल्या समृद्धी महामार्गासह नियोजित नागपूर गोवा द्रुतगती महामार्गासारख्या सुविधा उभ्या राहत आहेत; मात्र अनेक कारणांमुळे अशा प्रकल्पांना होणारा विलंब टाळून त्यांना अधिक गती देणे आवश्यक आहे. भौगोलिक असंतुलन दूर करून मु ंबई-ठाणे-पुणे व नाशिकच्या पलीकड े या विकासाची पावले वळली पाहिजेत. काहीशा मागे पडत असलेल्या उत्पादन क्षेत्राला गती देण्यासाठी नव्या उद्योगांच्या स्थापनेतील लालफीतशाही, भ्रष्टाचार अशा राजकीय-प्रशासकीय त्रुटी दुरुस्त करण्याची गरज आहे. त्यांच्यासाठी रस्ते, स्वस्त आणि अखंडित वीजपुरवठा, वित्तपुरवठा, ऊर्जा व पर्यावरण सुरक्षा यांकडेही विशेष लक्ष पुरवावे लागेल. याच ङ्गमॉर्गन स्ट ॅनलीफ्च्या एका अहवालानुसार महाराष्ट्रात सुमारे सव्वापाच टक्के इतके बेरोजगारीचे प्रमाण असून, शहरी भाग आणि सुशिक्षितांमध्ये ते अधिक आढळते. हे चित्र बदलण्यासाठी रोजगारक्षम क्षेत्रांमधील आवश्यक कौशल्य प्रशिक्षणावर भर द्यावा लागेल. हे लक्ष्य गाठतानाच स्थलांतर, शहरांमध्ये होणारे केंद्रीकरण, बकालीकरण, सुविधांवर येणारा ताण, हवामान व आरोग्यसंकटे, उत्पन्नातील विषमता या आनुषंगिक आव्हानांचाही सामना करावा लागणार आहे.

# पालकमंत्री अजितदादा शाळांच्या भवितव्यांसाठी आपला दिलेला वादा निभावतील काय?

## निधी देतील काय? ९४ शाळांना ईमारत नाही , ६०७ वर्गखोल्यांची दुरुस्ती आवश्यक , १४ कोटी ८५ लाखांचा प्रस्ताव नियोजनकडे :- डॉ.गणेश ढवळे







बीड :- काल दि.२५ जुलै शुक्रवार रोजी राजस्थानच्या झालावाड येथील सरकारी शाळेच्या वर्गाचे छत कोसळुन ३५ मुले दबली गेली त्यापैकी ७ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असुन या दुर्घटनेत जखमी झालेल्या २८ पैकी ९ मुलांची प्रकृती गंभीर जखमी आहेत. या घटनेमुळे मुलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असुन बीड जिल्ह्यातील शाळा इमारतींची अवस्था वाईट असुन ९४ शाळांना ईमारतच नाही तर ३८१ शाळांमधील ६०७ वर्गखोल्यांच्या दुरूस्तीची आवश्यकता आहे तर १४७ नविन वर्गखोल्या बांधकाम करणे गरजेचे आहे.यासाठी शिक्षण विभागाने १४ कोटी ८५ लाख रूपयांचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे दिला असुन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांच्या ह्याला पाझर फुटेल काय? आणि शाळांच्या भवितव्यांसाठी निधी उपलब्ध करून देतील काय? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

बीड जिल्ह्यात शाळा ईमारतीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असुन धोकादायक मोडकळीस आलेल्या शाळांच्या ईमारत बांधकामासाठी निधी देण्यात यावा तसेच खोल्यांची दुरूस्ती करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर व सहका-यांनी लक्ष्यवेधी आंदोलने करून शासन आणि प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. धोकादायक इमारतींच्या भिंती,छत कोसळुन विद्यार्थी जखमी झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत.अनेक ठिकाणी ईमारत नसल्याने शाळा उघड्यावर, मंदिरात, चावडीत भरत आहेत.पावसाळ्यात पाऊस आल्यावर अनेकदा शाळांना सुट्टीही द्यावी लागते.

अजितदादा दिलेला वादा पाळतील काय?शाळांच्या भवितव्यांसाठी " डीपीसी" मधुन निधी मिळेल काय?? ९४ शाळांना ईमारत नाही ,६०७ वर्गखोल्यांची दुरुस्ती

**आवश्यक,१४ कोटी ८५ लाखांचा प्रस्ताव नियोजनकडे :- डॉ.गणेश ढवळे**

शाळांच्या दुरुस्तीसाठी आणि धोकादायक व मोडकळीस आलेल्या शाळांच्या नविन ईमारत बांधकामासाठी निधी देण्यात यावा यासाठी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर वारंवार आंदोलने केलेली आहेत. पालकमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन निवेदन दिल्यानंतर अजितदादा यांनी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते ते पाळतील काय??लोकभावना लक्षात घेऊन यावेळी जिल्हा नियोजन समितीमधुन शाळांसाठी भरीव निधी मिळेल अशी अपेक्षा असल्याने शिक्षण विभागाने १४ कोटी ८५ लाख रुपयांचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे पाठविलेला आहे. जिल्हा नियोजन समितीची बैठक होऊन अनेक दिवस उलटले असले तरी अद्याप शाळा दुरूस्ती आणि नविन ईमारतींचे नियोजन झालेले नाही. शाळा सुरू होऊन दीड महिना उलटला असुन दुरूस्तीच्या हालचाली नाहीत.पावसात विद्यार्थी जीव मुठीत घेऊन ज्ञानार्जन करत असल्याने जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून गावात अनेक कामे करत असताना ईतर कामे थोडी बाजुला ठेवून लेकरांच्या भविष्यासाठी आवश्यक असलेल्या शाळा इमारतींसाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे अशी विनंती डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

**जिल्ह्यातील २४७१ शाळांची तालुका निहाय शाळांची संख्या व निधीची आवश्यकता**

**तालुका- शाळा - वर्गखोल्या -निधी**

अंबेजोगाई -२३-४३-१०७.५०
आष्टी -२६-५५-११६.५०
बीड -३६-६२-१५४.५०
धारूर -३०-५७-१४२.५०
गेवराई -४३-७६-१९०.००
केज -३२-४१-९७.५०
माजलगाव -३९-६३-१५७.५०
परळी -४२-७६-१९०.००
पाटोदा -२६-३४-८५.००
शिरूर -२०-२४-५२.५०
वडवणी -६६-७६-१९२.००
एकुण -३८१-६०७-१४८५.००

**जिल्ह्यातील शाळांची संख्या २४७१ तालुका निहाय**

अंबेजोगाई १७६
आष्टी २७६
बीड. ४३६
धारूर. १३०
गेवराई. ३२४
केज. २४५
माजलगाव २२७
परळी. १८८
पाटोदा. १८१
शिरूर १८९
वडवणी. ९९
एकुण. जिल्ह्यातील शाळांची संख्या २४७१

**इमारत नसलेल्या शाळा तालुका निहाय**

**तालुका - शाळा - वर्गखोल्या**

अंबेजोगाई - ५ - ५
आष्टी. ४ - ४
बीड. ३३ - ३४
धारूर ११ - ११
गेवराई. १० -१५
केज. १२-१२
माजलगाव ०९-०९
परळी. ०-०
पाटोदा. ०३-०३
शिरूर. ०७-०७
वडवणी. ०-०
एकुण. ९४ -१००

# शासकीय आयटीआय आष्टी येथे माजी सैनिक व वीर मातांचा विजय दिवस निमित्त सन्मान

कडा (प्रतिनिधी) श्री गुरुलिंग स्वामी जीबकाटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आष्टी येथे दिनांक २६ जुलै रोजी मंत्री श्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून 'विजय दिवस' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात माजी सैनिक, वीर माता व वीर पत्नी यांचा शाल व मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विविध देशभक्तीपर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धक विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी सैनिक श्री कैलास रेडकर फौजी यांनी भूषवले, तर प्रमुख वक्ते म्हणून शिल्प निदेशक श्री ज्ञानेश्वर दहिफळे, श्री भीमराव घागडे आणि श्री खामकर फौजी यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य श्री गणेश हडतगुणे यांनी केले.या वेळी




८६ वर्षीय माजी सैनिक श्री खामकर फौजी यांनी उपस्थितांना त्यांच्या चार युद्धांतील अनुभव सांगितले. त्यांनी युवांना निर्व्यसनी राहण्याचे, देशासाठी सदैव सज्ज राहण्याचे आणि शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहण्यासाठी नियमित व्यायाम करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमात उपस्थित वीर पत्नी केसरबाई अश्रुबा राऊत व संगीता ताई घोलप यांचा विशेष सन्मान करण्यात आला.तसेच पुढिल प्रमाणे माजी सैनिकांचा मान्यवर म्हणून गौरव करण्यात आला. श्री राजू जगदाळे, श्री भीमराव वालेकर, श्री रघुनाथ खोले, श्री दामोदर चव्हाण, श्री जालिंदर धोंडे, श्री धनंजय गावडे, श्री भाऊसाहेब भोसले, श्री मधुकर बांबदाळे, श्री अर्जुन गळगटे, श्री नारायण झगडे, श्री प्रल्हाद तोडकर, श्री प्रल्हाद आजबे, श्री गोरख पवार, श्री अरुण शेंडगे, श्री गोरख धनवडे, श्री सोपान कोकणे, श्री प्रमोद गळगटे, रहमान पठाण, श्री लक्ष्मण जगताप, श्री गोवर्धन तरटे, श्री विकास मस्के, श्री रमेश डिडुळ, श्री भाऊसाहेब नाकाडे, श्री वाहिद खान, श्री काझी साहेब यांचा समावेश होता. यावेळी आयटीआय संस्था व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री अक्षय शिरस्वाल, महात्मा गांधी विद्यालय आष्टीचे सायकड सर व नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री विलास डोके सर तसेच कार्यक्रमास बहुसंख्येने विद्यार्थी, शिक्षकवर्ग व नागरिकांची उपस्थिती लाभली. देशप्रेम व शौर्याचे स्मरण करून देणारा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेतील सर्व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले

# सिध्देश्वर मंदिरात
## श्रावणमास उत्सवाचे आयोजन

शहरवासीयांचे आराध्य दैवत असलेल्या सिध्देश्वर मंदिरात श्रावणमास उत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन महिणाभरात भस्मआरती, विवीध अलंकार, पारायणाचे आयोजन करण्यात आले असुन याचा भाविक-भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन सुकाणू समितीच्या वतीने करण्यात आले आहे. सिंदफणा नदीकाठावर असलेल्या पुरातन सिध्देश्वर मंदिरात श्रावणमासानिमीत्त मंदिराची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. यावर्षीच्या श्रावण मास उत्सवात दि.२८ जुलैला प्रथम सोमवारी सहस्त्र बेल अर्चन व अरणेश्वर महादेव श्रृंगार, दि. ४ ऑगस्टला व्दितीय सोमवारी सहस्त्र कमळ पुष्प अर्चन व फुल बंगला श्रृ ंगार, दि. ११ ऑगस्टला तृतीय सोमवारी सहस्त्र भस्म अर्चन व बाबा बर्फानी श्रृ ंगार, ५६ भोग नैवेद्य, दि.१८ ऑगस्टला चतुर्थ सोमवारी सहस्त्र पंचफुल अर्चन व जलविहार श्रृ ंगारसोबत एक हजार लाडु नैवेद्य चढविण्यात येणार आहे. त्याचबरोबर दि. २ ते ४ ऑगस्ट दरम्यान शिवलीलामृत सामुहिक पारायण, दि. ३ ऑगस्टला रात्री रूद्र पुजा व सत्संग, दर श्रावण सोमवारी सुर्योदय ते सुर्यास्त असा अखंड रूद्र अभिषेक तर दि. २१ श्रावण मासिक शिवरात्री निमीत्त भगवंतास भस्मआरती असे धार्मीक कार्यक्रम होणार आहेत. याचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन सुकाणू समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# परळी वैजनाथमध्ये २१७ किलो चंदन पकडले

परळी वैजनाथ । प्रतिनिधी परळी वैजनाथ शहराच्या उपनगरात चंदन तस्करीचा मोठा प्रकार उघडकीस आला आहे. बीड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त माहितीनंतर टाकलेल्या धाडीत सुमारे २१७ किलो चंदन लाकूड जप्त केले असून त्याची अंदाजित किंमत ८ लाख ६८ हजार रुपये आहे. मात्र छाप्यावेळी संशयित चंदन तस्कर हे घटनास्थळावरून फरार झाले. ही कारवाई २३ जुलै रोजी रात्री ८.३० वाजता करण्यात आली. परळी वैजनाथ रेल्वे पटरीच्या उत्तर बाजूस इराणी गल्लीच्या परिसरात काही तस्करांनी कापडी पालांमध्ये मोठ्या प्रमाणात चंदन साठवले असल्याची माहिती बीड एलसीबी पथकाला मिळाली होती. पथकाने तत्काळ त्या ठिकाणी धाड टाकली. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच संशयित घटनेच्या काही क्षणांपूर्वीच फरार झाले. ही कारवाई बीड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात हवालदार रामचंद्र केकान, नाईक पोलिस कॉन्स्टेबल गोविंद भताने, पो. कॉ. सचिन आंधळे यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या वेळीच आणि योजनाबद्ध कारवाईमुळे मोठ्या प्रमाणावर चंदन तस्करी रोखण्यात यश आले आहे. मात्र परळी व परिसरात मागील काही महिन्यांपासून चंदन लाकूड तस्करीचे रॅकेट सक्रिय असल्याचे संकेत मिळत होते. ही कारवाई केवळ एका टोळीचा भाग असण्याची शक्यता असून मागील कारवाया व साखळी तस्करीच्या दिशेने तपास सुरु आहे. या घटनेप्रकरणी परळी संभाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथक तयार करून पाठविण्यात आले आहे.

# तक्रार देवून ५ दिवस झाले तरीही दिंद्रुड पोलिसांनी ना एनसी दाखल केली ना एफआयआर

## एसपी साहेब, २४ तासात एनसीची दखलचा फज्जा उडाला आदेश तुम्ही दिले मात्र तक्रार देवून ५ दिवस झाले तरीही दिंद्रुड पोलिसांनी ना एनसी दाखल केली ना एफआयआर

पतसंस्थेत येऊन सर्व कर्मचाऱ्यांसमोर शिवीगाळ करत मारहाण करण्याची धमकी दिल्याचा प्रकार कारी (ता.धारूर) येथील जिजाऊ महिला नागरी पतसंस्थेत घडला. याप्रकरणात दिनांक १८ जुलै रोजी दिंद्रुड पोलिस ठाण्यात पतसंस्थेच्या अध्यक्षा शितल लक्ष्मण मोरे यांनी तक्रारही दिली. मात्र पोलिसांनी तक्रार अर्ज सुध्दा घेतला नाही. त्यानंतर २० तारखेला पुन्हा अर्ज दिला तो केवळ ठेवून घेतला, याप्रकरणात पाच दिवस झाले तरीही ना एनसी दाखल झाली, ना एफआयआर झाला. दिंद्रुड ठाण्याचे एपीआय ढाकणे साहेब, मात्र हे तुमचं घरचं मॅटण आहे. घरच्याघरी मिटवा असे सांगत आहेत. तक्रार देवूनही दखल घेतली जात नसेल आणि मिटवामिटवीचा सल्ला दिला जात असेल तर उद्या कोणीच तक्रार द्यायला पुढे येणार नाही. एकीकडे एसपीसाहेबांनी २४ तासात एनसी दाखल करून कारवाईच्या सुचना दिल्या आहेत. मात्र दुसरीकडे त्यांचेच अधिकारी त्यांच्या सुचनांकडे दुर्लक्ष करून पाच-पाच दिवस एनसी किंवा एफआयआर दाखल करून घेत नसतील तर हा प्रकार म्हणजे एसपी साहेबांच्या संकल्पनेला हरताळ फासण्यासारखाच असल्याची चर्चा होवू लागली आहे. धारूर तालुक्यातील कारी येथील जिजाऊ महिला नागरी पतसंस्थेत दिनांक १७ जुलै २०२५ रोजी कर्जदार केशरबाई बबन मोरे यांनी संस्थेत येवून सर्वांसमोर पतसंस्थेच्या अध्यक्षा शितल लक्ष्मण मोरे यांना शिवीगाळ करत मारहाण करण्याची धमकी दिली. तेलगाव येथील पतसंस्थेच्या शाखेतून महिलांना कर्ज दिले जाते. त्यामध्ये कर्जदार केशरबाई बबन मोरे यांना सन २०२१ साली ५० हजार रूपये कर्ज देण्यात आले होते. कर्जवसुलीसंदर्भात कर्मचार्यांनी वेळोवेळी भेटी दिल्या.वसुलीपोटी त्यांनी जामीनदार (पती) बबन लिंबाजी मोरे यांचे दिलेल्या चेकद्वारे १० हजार रूपयांची रक्कम पतसंस्थेकडून कपात केली. कपात रक्कमेचा राग मनात धरून कर्जदार केशरबाई मोरे यांनी शिवीगाळ करून मारहाणीची धमकी दिल्याचा आरोप पतसंस्तेच्या अध्यक्षा शितल मोरे यांनी तक्रारीत केला आहे. त्याचबरोबर बबन मोरे यांनी शितल मोरे यांचे पती लक्ष्मण मोरे यांचा मोबाईल पळवून नेला आहे. कपात झालेली १० हजाराची रक्कम परत करा तरच मोबाईल परत देईल असे म्हणत बबन मोरे हा शिवीगाळ करून जिवे मारण्याची व माझ्यापतीवर खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देत असल्याचे शितल मोरे यांनी तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणात पोलिसांनी केवळ तक्रार अर्ज घेवून ठेवला आहे. आता गुन्हा दाखल करायला ढाकणे साहेब, नेमका कशाचा मुर्हत पाहत आहेत असा प्रश्न उपस्थित होवू लागला आहे.



# राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करावी : नगरसेवक ॲड. जोगदंड

बीड । प्रतिनिधी आपल्या धारदार लेखणीतून आत्मभान नसलेल्या, कष्टकरी कामगार मजुरांचे वंचित उपेक्षितांचे दाहक प्रश्न आणि त्यांचा इतिहास जगाच्या वेशीवर टांगून, भारतीय संविधानाचे एकमेव शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच मार्क्स, लेनिन यांचा सामाजिक मूल्यवाद समाजातील तळगळातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी, समाज प्रबोधनाचे प्रभावी शस्त्र वापरून संयुक्त महाराष्ट्र ाच्या लढ्याला सामाजिक परिवर्तनाचा अलंकार चढविणारे, लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती राज्यातील सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयात साजरी करावी, अशी मागणी भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक /अध्यक्ष तथा नगरसेवक ॲड. विकास जोगदंड यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे. रशिया सारख्या देशात मराठी भाषेची आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची प्रचित करुन देणारे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे पहिले लेखक होते. जग बदल घालुनी घाव सांगून गेले आम्हा भिमराव असे सांगत प्रस्थापितांनी लादलेली गुलामगिरी लाथाडत जातीय द्वेषी मानसिकतेने बरबटलेल्या व्यवस्थेशी लढण्यासाठी एल्गार पुकारला. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातच बहुजनांची क्रांती समावलेली आहे असा प्रत्यक्षात त्यांनी संदेश दिला आहे. अण्णाभाऊ साठेनीं आपल्या जिवंत साहित्यातून उपेक्षित समूहातील मानवाला नायक बनवले म्हणून राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे

# पिकअप थेट मोठ्या नाल्यात उलटले

## गेवराई नगरपालिकेला कधी जाग येणार : अश्विन जवंजाळ



बीड जिल्ह्यात परतीच्या पावसाने धुमशान घातले आहे. ठिकठिकाणी मुसळधार पावसामुळे पाणीच पाणी साचले आहे. मोठ्या नाल्यांमुळे पाण्याचा अंदाज न आल्याने पिकअप उलटले गेल्याची घटना दि. २५ जुलै रोजी दुपारी घडली. सुदैवाने या दुर्घटनेमध्ये कोणाला जिवीत हानी झाली नाही तसेच गेवराई शहरात जोरदार पाऊस असल्याने शहरातील संपूर्ण नाल्या व रस्ते पाण्याने ओसडून वाहू लागले आहेत शहरातील मुख्य वस्तीत असलेले मोंढा भाग परिसरात ज्योति क्रांती मल्टीस्टेटच्या समोर एक मोठा नाला बांधण्यात आलेला आहे मात्र या नाल्याचा अंदाज न आल्यामुळे पिकअप चालकाला गाडीचा तोल संभाळता आला नाही आणि थेट गाडी त्या नाल्यामध्ये उलटली रस्ता छोटा झाला मोठा अशा स्थितीत रस्ता असल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना अडथळा ठरत आहे पिकअप मोठ्या नाल्यावर म्हणजेच पिकअप गाडी नाल्याच्या पाण्यातून किंवा पाण्याच्या जवळून जाण्याचा प्रयत्न करत आहे. हे धोकादायक असू शकते, कारण नाल्याचे पाणी कधीकधी खूप खोल असू शकते आणि गाडी अडकू शकते? याचा अंदाज चालकाला आलाच नसल्यामुळे गाडी नाल्यात गेल्यावर परिसरात खळबळ उडाली असून मात्र त्या नाल्यात तुडुंब असे पाणी साचले आहे त्या पाण्याला बाहेर निघण्यासाठी पुढे कुठेही वाट नसल्यामुळे ते पाणी तिथेच अडकून बसत आहे याकडे गेवराई नगरपरिषद स्वच्छता विभागाचे दुर्लक्ष पाहायला मिळते लोकांच्या जीवावर बेदण्यासारखे काम न.प. प्रशासन करत असल्याचे पाहायला मिळाले याबाबत गेवराई नगरपालिकेला कधी जाग येणार असा संतप्त प्रतिक्रिया युवा नेते अश्विन जवंजाळ यांनी व्यक्त केली आहे.

# महावितरणाच्या भोंगळ कारभारामुळे भुरभुर पावसात विद्युत पुरवठा दिवसभर खंडित :-शेख युनूस



बीड (प्रतिनिधी) बीड शहरात व ग्रामीण भागात महावितरण कडून नागरिकांना दिवसभर विद्युत पुरवठा पासून वंचित राहावे लागत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस चालू आहे.आणि भुरभुर पाऊस सुरू झाला की बत्ती गुल अशी परिस्थिती शहरात व ग्रामीण भागात झालेली आहे. उन्हाळ्यापेक्षाही भयानक गर्मी पावसाळ्याच्या वेळी होते, आणि अशात लाईट केल्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. महावितरणाच्या भोंगळ कारभाराविरुद्ध कोणीही नेता बोलायला तयार दिसत नसल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी दिसून येत आहे. पावसाळ्याचे दिवस आहे व मोठा पाऊस आणि वारा सुटला तर वीस पुरवठा खंडित होणे समजण्यासारखे आहे परंतु भूर भूर पाऊस झाला तरी, शहरातील प्रत्येक भागातील वीज पुरवठा खंडित होत आहे.आणि एक दोन तास नव्हे तर पाच ते सहा तास वीजपुरवठा होत नसल्यामुळे नागरिकांना प्रश्न पडत आहे की, लोडशेडींग तर चालू नाही. लाईट नसल्यामुळे घरगुती कामामध्ये तसेच व्यापाऱ्यांनाही मोठा फटका बसत असल्याचे दिसून येत आहे. वीज महावितरणाच्या या गलथान कारभाराविरुद्ध खासदार तसेच आमदार पण काही बोलला तयार दिसून येत नाही.माझी मा. श्री. अजित दादा पवार उपमुख्यमंत्री तसेच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांना विनंती आहे की, त्यांनी महावितरणाच्या अधिकाऱ्यांशी बैठक घेऊन त्यांना सूचना द्याव्यात.व नागरिकांची नाराजी दूर करावी.

# नारेवाडी ग्रामस्थांची श्री क्षेत्र भगवानगडाला ५३ लाख रुपयांची देणगी जाहीर

भगवानगड । प्रतिनिधी श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात. श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.



श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे नारेवाडी (ता.केज जि.बीड) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ५३ लाख रुपये झाली. नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# गेवराई तालुक्यात अवैध वाळू माफियांचा धुमाकूळ; तहसीलदार संदीप खोमणे यांचे संशयास्पद मौन !

## जिल्हाधिकाऱ्यांना आव्हान: जबाबदारी निश्चित करुन कारवाई करा !



गेवराई । प्रतिनीधी गेवराई तालुक्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीने थैमान घातले आहे. राक्षसभुवन, म्हाळसपिंपळगाव, खामगाव, सुरळेगाव, संगम जळगाव आणि हिंगणगाव येथील गोदावरी नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत असून, त्याची खुलेआम वाहतूक होत आहे. विशेष म्हणजे, जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांनी संयुक्त पथक स्थापन करूनही वाळू माफियांचे मनसुबे काही थांबलेले नाहीत. यामागील सर्वात मोठे कारण म्हणजे तहसीलदार संदीप खोमणे यांचे संशयास्पद मौन आणि कर्तव्यातील कसूर ! गेवराई पोलिस आणि स्थानिक गुन्हे शाखेने वेळोवेळी वाळू माफियांवर कारवाई केली असताना, तहसीलदार खोमणे यांच्याकडून कोणतीही ठोस कारवाई का होत नाही? हा प्रश्न तालुक्यातील जनतेला पडला आहे.

### वाळू माफियांचा बेकायदा धंदा जोरात

गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातून दररोज शेकडो ट्रॅक्टर, हायवा आणि जेसीबीच्या साहाय्याने अवैध वाळू उपसा होत आहे. राक्षसभुवन, म्हाळसपिंपळगाव, खामगाव, सुरळेगाव, संगम जळगाव आणि हिंगणगाव येथील नदीपात्रात खणखणीत खड्डे पडले असून, पर्यावरणाचा गंभीर हास होत आहे. गेवराई शहरासह तालुक्यात शंभरहून अधिक वाळूचे ढीग खुलेआम दिसत असताना, तहसीलदार संदीप खोमणे यांचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष आहे. स्थानिकांचा आरोप आहे की, तहसीलदारांच्या या निष्क्रियतेमुळे वाळू माफियांना मोकळे रान मिळाले आहे.

### पोलिस कारवाई करतात, मग तहसीलदार गप्प का?

गेवराई पोलिस आणि स्थानिक गुन्हे शाखेने वेळोवेळी अवैध वाळू उपसावर कारवाई केली आहे. उदाहरणार्थ, २३ जुलै रोजी खामगाव गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करणाऱ्या ट्रॅक्टरसह २७लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याशिवाय, १७ जून २०२५ रोजी तपेनिमगाव शिवारात तलवाडा पोलिसांनी ६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिस अधीक्षक नवनीत कांवत आणि अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी वाळू माफियांवर कडक कारवाई केली आहे. मग तहसीलदार संदीप खोमणे यांच्याकडून असा पुढाकार का दिसत नाही?

### प्रशासनाला जाग येणार का ?

गेवराई तालुक्यातील वाळू माफियांचा हा सुळसुळाट तहसीलदार संदीप खोमणे यांच्या नाकर्तेपणामुळे आणि संशयास्पद मौनामुळे आहे. प्रशासनाने याची तात्काळ दखल घेऊन कायदेशीर कारवाई न केल्यास, जनतेचा संताप आणि आंदोलन अटळ आहे. जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांनी तातडीने पावले उचलून वाळू माफियांना आळा घालावा आणि तहसीलदारांच्या भूमिकेची सखोल चौकशी करावी, अशी मागणी गेवराई तालुक्यातील जनता करत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २७ जुलै २०२५
https://lokaarambh.com



# तरुणीला जबरदस्तीने कारमध्ये बसवलं वेगवेगळ्या ठिकाणी नेत बलात्कार

सध्या एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. लोणावळ्यात एका तरुणीवर अत्याचार झाल्याची माहिती समोर येत आहे... सतत महिलांवर अत्याचाराच्या घटना समोर येत असल्यामुळे महाराष्ट्रात महिला सुरक्षित आहेत का? असा प्रश्न निर्माण होत आहे. आता देखील असंच काही झालं आहे. लोणावळ्यात स्थानिक तरुणीवर अत्याचार झाले आहेत. तरुणीवर गाडीत बलात्कार झाल्याचं उघड झालं आहे. ज्यामुळे परिसरात खळबळ माजली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, लोणावळा शहरात माणुसकीला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. लोणावळ्यातील एका स्थानिक तरुणीवर कारमध्ये बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पीडित तरुणीला लोणावळा परिसरातून जबरदस्तीने कारमध्ये बसवून तिच्यावर गाडी थांबवत वेगवेगळ्या ठिकाणी अत्याचार करण्यात आले. त्यानंतर आरोपीने तिला सामसूम असलेल्या रस्त्याच्या कडेला टाकून दिलं.याबाबत लोणावळा शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला असून, एक आरोपीला अटक करण्यात



पोलिसांना यश आलेय तर इतर दोन नराधमांचा शोध सुरुये. महत्त्वाची गोष्ट म्हणजे पोलिसांनी आरोपीला 12 तासांत अटक केलं आहे. याप्रकरणी पोलीस तपास करत असून, धक्कादायक घटनेनंतर नागरिकांध्ये संतापाची लाट उसळली आहे. सांगायचं झालं तर, काही महिन्यांपूर्वी पुण्यातील स्वारगेट येथे देखील एक धक्कादायक घटना घडली. 26 वर्षीय तरुणीवर एका नराधमाने बसमध्ये बलात्कार केला. आरोपी दत्ता गाडे याने तरूणीला फसवून दुसऱ्या बसमध्ये नेलं आणि तिथे तिच्यावर एकदा नव्हे दोनदा अत्याचार केला, त्यानंतर तो फरार झाला. अनेक तासांच्या शोधमोहिमेनंतर पोलिसांनी त्याला त्याच्या गुणाट गावातून बेड्या ठोकून अटक केली. याप्रकरणामुळे देखील वातावरण तापलं होतं.

महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटना दिवसागणिक वाढत आहेत. त्यामुळे देशाच्या कोणत्याच कोपऱ्या महिला सुरक्षित नाहीत... असं चित्र दिसून येत आहे. पोलिसांकडून महिलांवर अत्याचार होत असतील तर पोलीस कर्तव्य विसरलेत असं म्हणायला हरकत नाही?

## रणरागिणी ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत नेत्र तपासणी शिबिराचा जनतेने लाभ घ्यावा : राहुलकुमार राका





महाराष्ट्राचा पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री रणरागिणी ना.पंकजाताई गोपीनाथराव मु ंड े यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्र संत श्री आनंदऋषीजी महाराज नेत्रालय छत्रपती शिवाजी महाराज चौक राजवर्धन कॉम्प्लेक्स गेवराई येथे मोफत नेत्र तपासणी शिबिराचे दि .२६ तारखेला शनिवार रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता कार्यक्रमाचे आयोजन केले आहे तरी जनतेनं याचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजपाचे युवा नेते संस्थापक सदस्य, वैद्यनाथ बँक सल्लागार व महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष नोटरी ड राहुलकुमार राका, भारतीय जनता पार्टी चे विस्तारक ईश्वरजी पवार, भाजपाचे युवा नेते सुघोष भैय्या मु ंडे , भाजपाचे युवा नेते कृष्णा ढाकणे, भाजपाचे युवा नेते कृष्णा बारगजे ,भाजपाचे युवा नेते डॉक्टर शेख इब्राहिम, युवा नेते मंजूर भाई बारूद वाले, भाजपाचे युवा नेते महेश नागरे, भाजपाचे युवा नेते अनिकेत मु ंडे, संगम जळगाव ग्रामपंचायतचे अक्षय नागरे , भाजपा चे युवा नेते बाबा घोडके, भाजपाचे युवा नेते शिरीष मु ंडे , युवा नेते बबन जाधव व भाजपा ने केले आह

## अनाथांच्या कुशीत साजरा झाला वाढदिवस;
### कौशल्याताईंनी दिला मायेचा स्पर्श..!

जिव्हाळा बेघर निवारा केंद्रामध्ये सामाजिक कार्यकर्त्या सौ. कौशल्या चव्हाण आणि केंद्रातील सर्वांच्या माई असलेल्या छायाताई यांचा वाढदिवस अनाथ बेघर बांधवांसोबत अत्यंत भावनिक वातावरणात साजरा झाला. स्वतःचा वाढदिवस समाजातील उपेक्षितांसोबत साजरा करणे हीच खरी माणुसकीची जाणीव असल्याचे उदाहरण कौशल्या ताईंनी आज घालून दिले. त्यांनी स्वतः सकाळी उठून आपल्या हाताने अन्न तयार केले आणि प्रेमाने प्रत्येक अनाथाला आपल्या हाताने वाढू न जेवण दिले. कार्यक्रमानंतर बोलताना कौशल्या ताईंनी मन हेलावून टाकणाऱ्या शब्दांत भावना व्यक्त केल्या. त्यांनी म्हटले, या ठिकाणी येऊन जेव्हा मी या बेघरांचा वेदनेने भरलेला आवाज ऐकला, तेव्हा मन सुन्न झाले. वृद्धापकाळात आपल्या लेकरांकडून आधाराची अपेक्षा असते, पण काही लोक इतके निष्ठुर का होतात की आईवडिलांना रस्त्यावर सोडतात? हे आपल्या समाजासाठी खूप दुःखद आहे.

## वांगी येथे बिबट्याने फस्त केल्या ११ शेळ्या

बीड । बीड तालुक्यातील वांगी परिसरात बालासाहेब गोरख हाडूळे या शेतकऱ्याच्या ११ शेळ्या ह्या बिबट्याने ठार मारल्या आहेत. हि घटना आज दिनांक २५ जुले २०२५ रोजी सकाळी १ वाजेच्या सुमारास घडली आहे. यापूर्वीही बिबट्याने एका वासराचा बळी घेतला होता.. तरी वांगी, शिवणी, काठोडा, भवानवाडी, कुटेवाडी, जरुड, बाभळखुटा, बोरफडी, हिवरा, मोजवाडी, मौज, बकरवाडी, घाटसावळी, पोखरी, मेंदा या गावातील गावकरी व परिसरातील सर्व शेतकरी बांधवांनी शेती कामे करताना काळजी घ्या व आपले जनावरेही सुरक्षित ठ वावी. संबंधित घटनेबाबत वन विभागाशी संपर्क झाला असून शेतकरी बांधवांनी सतर्क राहून सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे

## ॲड प्रकाश कवठेकर यांना महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार २०२५ जाहीर आज वितरण

पुणे ( प्रतिनिधी ) बीड येथील तेजस ग्रुप चे चेअरमन माजी जि प सदस्य अ‍ॅड प्रकाश दादा कवठेकर यांना के पी एम मीडिया पुणे यांच्या वतीने महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.

थोडक्यात माहिती बीड येथील तेजस उद्योग समूहाचे चेअरमन व माजी जि प सदस्य अ‍ॅड प्रकाश दादा कवठेकर यांना ऑक्सीतेज मिनरल वॉटर या ब्रँड साठी हा पुरस्कार जाहीर झाला आहे. तेजस बेवरेजेस या कंपनीच्या अंतर्गत ऑक्सितेज मिनरल वॉटर मार्केटिंग प्रोडक्शन क्वालिटी हे या कंपनी ने जपले आहे, सर्वसामान्य कुटुंबामध्ये येऊन बीड जिल्ह्यामध्ये स्वतःचा ब्रँड निर्माण करण्याचे




काम दादांनी केला आहे आज मीतिला तेजस इलेक्ट्रिकल अँड सप्लायर्स, तेजस बेवरेजेस, तेजस इंडस्ट्रीज, तेजस अर्बन, तेजस अर्बन मल्टिनिधी, राजनंदनी अर्थमूव्हर्स इत्यादी कंपनी स्थापन करून शेकडो तरुणांना रोजगार उपलब्ध केला आहे.ही कंपनी ग्रामीण भागात उभा करून शेकडो मुलांना रोजगार उपलब्ध केलेला आहे. आज मितीला मराठवाडा व शेजारील जिल्ह्यामध्ये वितरण होत आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा सिने अभिनेत्री



प्रार्थना बेहेरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा संपन्न होत आहे हा सोहळा दिनांक २७ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता हॉटेल राजमुद्रा एचपी पेट्रोल पंपाच्या मागे मारुंजी गाव हिंजवडी पुणे या ठिकाणी संपन्न होत आहे.

# अंशराशीकरणाची वसूलीची १२ वर्षानंतर मिळणार संपूर्ण पेन्शन

## सेवानिवृत्ती वेतन धारकाना पेन्शन कम्युटेशन अंतर्गत १२ वर्षानंतरच्या कपातीस कोर्टाने व मॅटने दिली स्थगिती

बीड-प्रतिनिधी कम्युटेशन पेन्शन पुनर्स्थापनेचा कालावधी १५ वर्षावरील १२ वर्ष करण्याची मागणी जोर धरत आहे. ही दिर्घकाळ चाललेली मागणी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी संघटना मुख्यालय बीडच्या वतीने महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री आणी तसेच ग्रामविकास मंत्री तसेच मंत्रालयातील मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग व प्रधान सचिव वित्त विभाग आणी प्रधान सचिव ग्रामविकास विभाग यांना म.रा.जि.प.सेवानिवृत्त संघटनेचे जा.क्र.१५/२०२५दि.२३.७.२०२५ अन्वये अंशराशीकरणाची वसूलीस१२ वर्षापर्यंत करुन त्यानंतरच्या वसूलीस स्थगिती देण्याइतका शासन निर्णय घेण्यासाठी सादर केलेल्या मागणीत समाविष्ट करण्यात आले आहे. हा मुद्दा भारत देशातील ईतर राज्यात ओरिसा राज्याने १२ वर्ष करुन , राज्याने १२ वर्ष केला आहे व गुजरात राज्याने १३ वर्षात कम्युट ेशनची वसुली करण्याचे शासन निर्णय घेतलेले आहेत. पेन्शन कम्युट ेशन म्हणजे पेन्शन कम्युट ेशन म्हणजे पेन्शन कम्युट ेशन म्हणजे पेन्शन कम्युट ेशन म्हणजे पेन्शन कम्युट ेशन म्हणजे काय काय काय काय काय जेव्हा सरकारी कर्मचारी सेवानिवृत्त होतात , तेंव्हा त्यांना ४०% पेन्शन विक्री करुन पेन्शनचा एक भाग एकरकमी घेण्याचा पर्याय मिळतो यालाच पेन्शनचे कम्युटेशन म्हणतात. या बदल्यात त्यांची मासिक पेन्शन कपाती १५ वर्षात केली जाते , जेणेकरुन सरकार ती रक्कम वसूल करु शकेल. सध्याचा नियम असा आहे की, ही वसूली १५ वर्षात केली जाते. पुढील १५ वर्षापर्यंत त्या सेवानिवृत्त कर्मचा याच्या मासिक पेन्शनमध्ये कपात होत राहते आणी १५ वर्षानंतर संपूर्ण पेन्शन पून्हा सुरु केली जाते. १२ वर्षात पुनर्स्थापना का १२ वर्षात पुनर्स्थापना का १२ वर्षात पुनर्स्थापना का १२ वर्षात पुनर्स्थापना का १२ वर्षात पुनर्स्थापना का आवश्यक आहे? आवश्यक आहे? आवश्यक आहे? आवश्यक आहे? आवश्यक आहे? महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी संघटना आणी पेन्शनधारकाचे म्हणने आहे की १५ वर्षाचा पुनर्स्थापनेचा कालावधी खूप जास्त आहे हे आर्थिक दृष्ट्या अयोग्य असल्याचे त्यांचे म्हणने आहे. व्याजदरात घट झाल्यामुळे सरकारद्वारा वसुलीच्या गणनेत असमानता वाढली आहे.यामुळे सेवानिवृत्त कर्मचा-यांना त्यांच्याच पेन्शनचा मोठा हिस्सा गमवावा लागतो व त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. जर हा कालावधी १२ वर्ष केला गेला, तर कर्मचा-यांना त्यांची संपूर्ण पेन्शन जेष्ठ नागरिकाच्या पेन्शनधारकास लवकर मिळू शकेल. ज्यामुळे त्यांची आर्थिकस्थिती मजबूत होईल. प्रस्तुत अंशराशीकरण वसूली प्रकरणात उच्च न्यायालय खंडपीठ मु ंबई व महाराष्ट्र राज्य प्रशासकीय न्यायधिकरण छत्रपती संभाजीनगर व नागपूर यांनी अतिरिक्त होत असल्याने १२ वर्षानंतर स्थगिती आदेश पारीत केलेले आहेत. उच्च न्यायालय खंडपीठ मु ंबई यांचे सिव्हील रिटपीटीशन नं.११६४/२०२५ दि.१८.३.२०२५ अन्वये १२वर्षानंतरची वसूली करणे बाबत स्थगिती आदेश व महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश क्रमांक ओए/११८८/२०२४ एमएच ०७/२०२५ दि.८.७.२०२५ व नागपूर २ यांचे आदेश क्रमांक ६०९/२०२५ दि.२७/०६/ २०२५ अन्वये अंशराशीकरणाची १२ वर्षानंतर रक्कमेची वसूली करणेस स्थगिती आदेश दिलेले आहेत. करिता सेवानिवृत्त कर्मचा याकडून जादाची वसूली होत आहे यासाठी पेन्शनरच्या मागणी नुसार महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद सेवानिवृत्त संघटनेच्या वतीने शासनास निवेदनाव्दारे विनंती केलेली आहे ज्यात कम्युटेशन पेन्शनच्या पुनर्स्थापनेचा कालावधी १५ वरुन १२ वर्ष करणेबाबतची प्रमुख मागणी केलेली आहे. व त्याव्यतिरिक्त संघटनेचे जा .क्र मा ंक .१४/२५ दि.२३.७.२०२५ अन्वये केंद्र शासनाने जानेवारी २०२५ पासून वाढीव महागाई भत्ता २% प्रमाणे मंजूर केलेल्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने देखील २% वाढीव महागाई भत्ता माहे जानेवारी २०२५ पासून थकीत रक्कमेसह अदा करणे बाबतचे आदेश शासनाने लवकर निर्गमीत करावे ज्यामुळे शासकीय व निमशासकीय कर्मचारी आणी सेवानिवृत्त कर्मचारी यांना या महागाई भत्ता वाढीचा लाभ मिळेल

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com